माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

**निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२३/अपील/०४/२०२३/०२७८** **दिनांक-१४.०६.२०२३**

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२०.०३.२०२३ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१८.०४.२०२३ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२७.०४.२०२३ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :१४.०६.२०२३ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

## अपील क्र. ०४/२०२३

**अपीलकर्ता:** श्री. बाळू लहू उगले

**विरुध्द**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०३.२०२३ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २०.०३.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २६.०४.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २७.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २७.०४.२०२३ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०८.०५.२०२३ रोजी आयोजीत केली होती परंतू, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०५.२०२३ रोजी ई-मेलद्वारे वैद्यकिय अडचण असल्यामुळे सदर सुनावणीस हजर राहणे शक्य नसल्याने सुनावणी पुढे ढकण्यात येवून नवीन तारीख देण्याची विनंती केली होती, त्यानुषंगाने सदर सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन:श्च




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

सुनावणीस दिनांक ११.०५.२०२३ (गुरूवार) रोजी आयोजीत करण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.

**३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

i. वर्ष २०१२ पासून आजतागायत मा. आयोगातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे भत्ते व इतर सोई सुविधा यावर प्रत्येक अधिकारी निहाय व प्रत्येक वर्षनिहाय किती रक्कम (रूपये) खर्च केला गेला आहे? तसेच सदर भत्ते व इतर सोई-सुविधा यांचा मंजुरीसाठीच्या सादर केलेल्या तत्सम फाईल व इतर सर्व कागदपत्रांच्या नस्ती यांचा तपशील व नेमक्या कोणत्या आणि काय काय सोई सुविधा यांचा लाभ मिळाला आहे? याबाबतची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत.

ii. माझे ५० दिवसापुर्वीच्या म्हणजे दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या पत्रावर केलेली कारवाईबाबतची माहिती, सदर पत्रातील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजुरी व इतर सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.

iii. माझे ४८ दिवसापुर्वीच्या दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या जेष्ठता सूचीच्या आक्षेपाच्या पत्रावर केलेली कारवाईबाबतची माहिती. सदर पत्रातील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजूरी व इतर सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.

iv. माझे दोन महिन्यापूर्वीच्या दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या ईमेल च्या अनुषंगाने केलेल्या कारवाईबाबतची माहिती, सदर ईमेल मधील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजुरी, माझा पगार अदा करण्यात आलेली दिरंगाईची कारणे, यात संबंधित दोषी अधिकारी व त्यावर झालेली कारवाई याबाबत व इतर सर्व माहिती आणि कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

माहिती अधिकार अर्ज दिनांक २०.०३.२०२३ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

**वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर :-**

सन २०१२ ते आजतागायत या कालावधीतील माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे आपण आयोगाच्या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष त्याची तपासणी करावी व आपणांस आवश्यक असलेली कागदपत्रे माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे उपलब्ध करण्यात येईल.
टिप : कार्यालयात तपासणीला येण्यापूर्वी २ दिवस आधी अवगत करावे.

**वरिल मुद्दा क्रमांक (ii) व (iii) ला दिलेले उत्तर :-**

यासंबंधीत माहितीबाबत कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे सद्यस्थितीत माहिती उपलब्ध करून देता येणार नाही. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

**वरिल मुद्दा क्रमांक (iv) ला दिलेले उत्तर :-**

दि.१६.०१.२०२३ रोजीच्या ईमेलच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

*माहिती असमाधानकारक आहे. तसेच माहिती अपुरी असून मुद्देसूद नाही. कागदपत्रे सांक्षांकीत केलेली नाहीत.*

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथी यांना माहिती अधिकारांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ला उत्तर देवून, माहिती उपलब्ध असल्याचे कळविले आहे. ती कागदपत्रे फि भरून अपिलार्थी माहिती घेवू शकतील.

मुद्दा क्र. २ व ३ ला अपिलार्थी यांनी पाठविलेल्या पत्रावर काय कारवाई झाली याची माहिती मागीतली आहे, त्यावर माहिती अधिकारी यांनी कारवाई बद्दलचे उत्तर/माहिती उपलब्ध करणे अपेक्षीत नाही व ते माहिती अधिकारी यांचे कार्यकक्षेत येत नाही. परंतु, अपिलार्थी यांनी त्यासंबंधाने नस्ती, फाईल व कागदपत्रे यांचे साक्षांकित प्रती मागीतल्या आहेत, त्या मात्र अपिलार्थी यांना उपलब्ध करून देता येतील. करीता माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ते दस्तऐवज/नस्ती उपलब्ध करून द्यावे.

मुद्दा क्र. ४ मध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या ई-मेल वर काय कार्यवाही झाली, दिरंगाईची कारणे, संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर काय कार्यवाही झाल्याची माहिती, माहिती अधिकारी यांनी त्या अनुषंगाने दिलेल्या माहितीस हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

वरील कारण मिमासेवरून, अपिलार्थी यांचे अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे. माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संबंधाने आयोगातील कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. सदरहू माहिती, ही या निर्णयाच्या ७ दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

**अपील अंशत: मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

**अपिलार्थी यांना सदर माहिती या निर्णयाच्या ७ (सात) दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.**

14.06.2023

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. बाळू लहू उगले,
८०५, ओशिनिया 'ब' कासा रिओ,
लोढा पलावा, कल्याण शील रोड,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण,
जि.ठाणे- ४२१२०४.
मो.नं. ९८२००४३४१७

14.06.2023

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**